**सं. फौ. खटला क्र. ३३५/२०१९**
**निशाणी क्रमांक :–**

**कर्जत येथील एस. एन. थापेकर, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग कर्जत, यांचे न्यायालयात.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | : | ०७.०५.२०१९ |
| २. | फिर्याद दाखल दिनांक | : | ०६.०७.२०१९ |
| ३. | फिर्यादीचे नांव वय व पत्ता | : | धनलक्ष्मी महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, राशीन, ता.कर्जत, जि.अहमदनगर करीता क्लार्क –**श्री. अमोल अनिल पोटफोडे,** वय : ४०, व्यवसाय : नोकरी. रा.राशीन, ता.कर्जत, जि.अहमदनगर. |
| ४. | आरोपीचे नांव, वय व पत्ता | : | **श्री. पप्पु विठ्ठल उकिरडे**, वय : ३७, व्यवसाय : पेंटींग, मु.पो.मातंगगल्ली, राशीन, ता.कर्जत, जि.अहमदनगर. |

५. अपराधाचा तपशिल :–

तुझी पत्नी रोहिणी पप्पु उकिरडे हिने फिर्यादी संस्थेकडून पेंटींग व्यवसायासाठी घेतलेले कर्ज रक्कम रुपये २५,०००/– चे हप्ते व व्याजासह थकित असलेली रक्कम रुपये २८,०००/– ची फिर्यादीने मागणी केली असता कर्जदार हिचा पती व सदर कर्ज व्यवहाराचा जामीनदार म्हणून तू स्वतः तुझे खाते असलेले दि

अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को.ऑप. बँक लि., शाखा राशीन, ता.कर्जत, जि.अहमदनगर वरील धनादेश क्र.०७३२९३ रक्कम रुपये २८,०००/– दि. ०४/०५/२०१९ तुझ्या सहीनिशी दिलेला धनादेश फिर्यादीने त्याचे खाते असलेल्या दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को–ऑप बँक लि., शाखा राशीन, ता. कर्जत, जि. अहमदनगर दि.०४.०५.२०१९ रोजी वटण्यास टाकला असता, सदरचा धनादेश दि.०७.०५.२०१९ रोजी 'funds insufficient' या कारणास्तव न वटता परत आला. त्यानंतर फिर्यादीने त्यांच्या विधीज्ञामार्फत तुला दि.१७.०५.२०१९ रोजी पाठविलेली नोटीस तुला दि.२२.०५.२०१९ रोजी मिळून देखील तू सदर नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत धनादेशाची रक्कम फिर्यादीस दिलेली नाही म्हणून तु परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ चे कलम १३८ प्रमाणे दंडनिय अपराध केला अशी गुन्ह्याची तोहमत तुझ्यावर ठेवण्यात आलेली आहे.

येणे प्रमाणे गुन्ह्याचा तपशिल.

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2025.07.18 10:15:08 +0530

दिनांक : १८.०७.२०२५ **(एस. एन. थापेकर)**

ठिकाण : कर्जत न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१,

कर्जत.

**प्रमाणपत्र**

वरील गुन्ह्याचा तपशिल आरोपीस मराठीमध्ये वाचून व समजावून सांगितला. आरोपीचे निवेदन स्वतंत्रपणे नोंदविले आहे.

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2025.07.18 10:15:15 +0530

दिनांक : १८.०७.२०२५ **(एस. एन. थापेकर)**

ठिकाण : कर्जत न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१,

कर्जत.

**सं. फौ. खटला क्र. ३३५/२०१९**
**निशाणी क्रमांक :–**

## आरोपीचे निवेदन

**कर्जत येथील एस. एन. थापेकर, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग कर्जत, यांचे न्यायालयात.**

आरोपीचे नांव, वय व पत्ता : पप्पु विठ्ठल उकिरडे,
वय : ३७, व्यवसाय :पेंटींग,
मु.पो.मातंगगल्ली, राशीन,
ता.कर्जत, जि.अहमदनगर.

प्रश्न १. तुला फिर्याद व त्यासोबतच्या कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या काय ?
उत्तरः होय.

प्रश्न २. तुझ्या विरुध्दच्या गुन्हयाचा तपशील वाचून व समजावून सांगितला तो तुला समजला काय ?
उत्तरः होय.

प्रश्न ३. तुला सदर गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तरः मला गुन्हा कबुल नाही.

SHIVAJI N THAPEKAR Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR Date: 2025.07.18 10:15:21 +0530

————————————

आरोपीची सही/अंगठा
दिनांकः १८/०७/२०२५

(एस. एन. थापेकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.